शनिवार दि.८ मार्च २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता

बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत     संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१७४ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in







## महाराष्ट्रातील लाखो नागरिक होणार वीज बिलमुक्त


# शेतकऱ्यांना ३६५ दिवस वीज उपलब्ध होणार–मुख्यमंत्र्यांची मोठी घोषणा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत मोठी घोषणा केली आहे. महाराष्ट्रातील वीज ग्राहकांसाठी योजना जाहीर करण्यात आली असून, यातून लाखो वीज ग्राहकांना वीज बिलमुक्ती मिळणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले आहे. प्रधानमंत्री सौरघर योजनेच्या धर्तीवर राज्यात नवीन योजना सुरू करण्यात येणार आहे. तसेच शेतकऱ्यांना ३६५ दिवस वीज उपलब्ध होणार असल्याचे देखील मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, नवीन वीज धोरणांतर्गत स्मार्ट मीटर बसवणाऱ्या ग्राहकांना व जे दिवसा वीज वापरतील त्यांना १० टक्के वीज दरात सवलत दिली जाणार आहे. हे ग्राहक आपल्या विजेच्या वापरावर अधिक चांगल्या पद्धतीने नियंत्रण ठेऊ शकतील आणि यामुळे राज्याच्या ऊर्जा बचतीला हातभार लागेल. जी वीज आपल्याला ८ रुपयांना पडत होती ती आता केवळ ३ रुपयांना पडणार आहे, म्हणजे यूनिटमागे ५ रुपये आपण वाचवत आहोत. याचा जवळपास ७० टक्के ग्राहकांना थेट फायदा होणार असल्याचेही फडणवीस यांनी म्हटले आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातील ७० टक्के ग्राहक हे ० ते १०० युनिट वीज वापरणारे आहेत. सरकारच्या नव्या योजनेनुसार, या ग्राहकांना सौरऊर्जा प्रकल्पांतर्गत वीज मोफत मिळणार आहे. सोलर पॅनल बसवण्यासाठी अनुदान देण्यात येणार आहे, ज्यामुळे दीड कोटी ग्राहकांना विजेबिलाचा भार सहन करावा लागणार नाही.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या बळीराजा मोफत वीज योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना देखील मोठा दिलासा मिळणार आहे. देवेंद्र फडणवीस म्हणाले, बळीराजा मोफत वीज योजना लागू करण्यात आली असून, याचा फायदा तब्बल ४५ लाख कृषी पंपधारकांना होणार आहे. या योजनेसाठी सरकारने १४ हजार कोटी रुपये तरतूद केली आहे. यामध्ये शासनाच्या सबसिडीची ५,५०० कोटींची बचत होणार आहे आणि एकूण वीज खरेदी खर्चात १० हजार कोटी रुपयांची बचत या माध्यमातून होणार आहे.या योजनेमुळे कार्बन उत्सर्जनात २५ टक्क्यांची कपात होणार आहे. मुख्यमंत्री कृषी वाहिनी प्रकल्पाअंतर्गत, २०२६ पर्यंत शेतकऱ्यांना संपूर्ण सौरऊर्जेवर आधारित वीजपुरवठा केला जाणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना ३६५ दिवस वीज उपलब्ध होणार असून, विजेच्या किमतीत मोठी कपात होईल.



## राज्यातील अराजकता मिटविण्यासाठी काँग्रेसकडून सद्भावना यात्रेचे आयोजन–डॉ श्रावण रॅपनवाड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । प्रतिनिधी**

पुरोगामी महाराष्ट्रात महायुतीच्या सत्ता काळात कायदा व सुव्यवस्थेचे धिंडवडे निघाले असून राज्यभर अराजकता व विद्वेष पसरला आहे. राज्यात पुन्हा ऐक्य भावना निर्माण करण्यासाठी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वात ८ मार्च जागतिक महिला दिनी मस्साजोग (जि.बीड) येथून 'सद्भावना पदयात्रा' काढण्यात येत असून काँग्रेस व पुरोगामी कार्यकर्त्यांनी या यात्रेत सहभागी व्हावे असे आवाहन काँग्रेस प्रदेश सचिव तथा भारतयात्री डॉ. श्रावण रॅपनवाड यांनी केले आहे.

जिल्हा काँग्रेस कार्यालयात सद्भावना यात्रा पूर्वतयारीसाठी बैठक संपन्न या बैठकीत ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचे सचिव तथा महाराष्ट्र सहप्रभारी कुणाल चौधरी, खा.प्रा. रवींद्र चव्हाण उपस्थित होते. यात्रेची माहिती देताना रॅपनवाड म्हणाले की,महाराष्ट्र काँग्रेस कमिटीचे नूतन




प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी क्शन मोडवर येत पदभार स्वीकारताच जिल्हाध्यक्ष व प्रदेश पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन मस्साजोग ते बीड अशी ५१ किमी अंतराची पहिली सद्भावना यात्रा जाहीर केली आहे. पुरोगामी समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्रात अलीकडील काळात प्रचंड विद्वेष निर्माण झाला असून जाती जातीत,धर्माधर्मात आणि प्रांत भेद करून विद्वेष अधिक पसरवला जात आहे. राज्यात कायदा व सुव्यवस्थेचे पुरते धिंडवडे निघून अनेक क्रूर व माणुसकीला काळीमा फासणाऱ्या घटना घडत आहेत. राज्यात महिला,युवक,विद्यार्थी, शेतकरी कुणीही सुरक्षित नाहीत. वाढलेली अराजकता कमी करून सद्भावना निर्माण करण्यासाठी काँग्रेसचे नूतन प्रदेशाध्यक्ष मा.आ. हर्षवर्धनजी सपकाळ यांच्या नेतृत्वात ही सद्भावना पदयात्रा काढण्यात येत आहे. या सद्भावना पदयात्रेत कट्टर काँग्रेस कार्यकर्त्यांसह पुरोगामी विचारांचे व समविचारी सामाजिक कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे असे आवाहन प्रदेश सचिव तथा यात्रा समन्वयक भारतयात्री डॉ श्रावण रॅपनवाड यांनी यावेळी केले आहे.

## महसूल विभाग ॲक्शन मोडवर

# जिलेटिनच्या साहाय्याने खडकपूर्णा जलाशयामध्ये पाच बोटी उडविल्या

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । प्रतिनिधी**

मा जिल्हाधिकारी बुलढाणा किरण पाटील यांचे मार्गदर्शना खाली दि.०६ रोजी अवैध रेती उपसा करणाऱ्या बोटींचा शोध घेण्यासाठी महसूल विभाग, पोलीस विभाग, परिवहन विभाग, खडकपूर्णा प्रकल्प विभाग यांनी संयुक्त पणे जिल्हा स्तरीय शोध व बचाव पथकाच्या सहाय्याने शोध मोहीम हाती घेतली. संपूर्ण दिवसभर ही कार्यवाही सुरू होती . ,काही बोटी मराठवाडा शिवारात जाफराबाद कडे पळून गेल्या. शेवटी मौजे चिंचखेड शिवारात अवैध रेती उपसा करणाऱ्या तीन फायबर बोटी व दोन इंजिन बोटी अशा एकूण पाच बोटी पकडण्यात आल्या . त्यांना किनाऱ्यावर आणून स्फोटके लावून उडविण्यात येऊन त्या नष्ट करण्यात करण्यात आले. सदर बोटी किनाऱ्यावर लावणे व त्यानंतर



जिलेटिन च्या साहाय्याने उदविण्यासाठी बराच त्रास घ्यावा लागला बराच अडचणीचा सामना करावा लागला, त्या अडचणीवर मात करत शेवटी बोटी उडविण्यात यश आले ही कार्यवाई मा उप विभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांचे मार्गदर्शन तथा उपस्थितीत पार पडली. यावेळी मा तहसीलदार वैशाली डोंगरजाळ, नायब तहसीलदार संतोष मुंडे, ना. तहसीलदार सायली जाधव, मंडळ अधिकारी विजय हिरवे, प्रल्हाद केदार, ग्राम महसूल अधिकारी विलास नागरे, परमेश्वर बुरकुल, सागर देशपांडे, सुमित जाधव, संजय बरांडे, तेजस शेटे महसूल सेवक काकडे व हरने ई. सर्व महसूल विभाग अधिकारी /कर्मचारी महिला पोलीस उपनिरीक्षक कोमल शिंदे व इतर पोलीस कर्मचारी, परिवहन विभागाचे अधिकारी परिवहन निरीक्षक प्रतीक रोडे व सहकारी , खडकपुर्णा प्रकल्प उपविभाग चे अधिकारी एस जे तल्हार व सहकारी ,शोध व बचाव पथक मोहीम चे पवार व त्यांचे सहकारी हजर होते.ही कार्यवाही रात्री ११ वाजेपर्यंत सुरू होती.

# देगलूरात अतिक्रमण हटाव मोहीम जिल्हा परिषद शाळा परिसर केला मोकळा

## पोलिस बंदोबस्तात हटविले अतिक्रमण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलुर । मधुकर शिरेवार**

देगलूर जिल्हा परिषद हायस्कूल (मुलांचे) समोर गेल्या कांही वर्षांपासून शहरातील अनेकांनी अतिक्रमण करून विविध व्यवसाय सुरू केले होते. ६ मार्च रोजी नगरपरिषद व पोलीस प्रशासनाच्या संयुक्त कारवाईतून अतिक्रमण हटविण्यास सुरुवात झाली आहे. शाळेतील मुला मुलींसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधा देखील उपलब्ध नव्हत्याः यामुळे शहरातील सामाजिक कार्यकर्ते धनाजी जोशी यांनी जिल्ह्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे पत्रव्यवहार करून शाळा परिसरात विद्यार्थ्यांसाठी सोयी–सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. यासंदर्भात माहिती घेण्यासाठी आलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना परिसरात अतिक्रमण झाल्याचे आढळून आले. त्यांनी गटशिक्षणाधिकाऱ्यां सोबत चर्चा केली. त्यामुळे ५ मार्च रोजी अतिक्रमण करून बांधली पक्की घरे●जिल्हा परिषद



हायस्कूल (मुलांचे) शाळेच्या मुख्याध्यापक व वरिष्ठ अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष झाल्यामुळे या शाळेच्या सर्व बाजूंनी खूप मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले आहे. तसेच या शाळेच्या बाजूलाच जिल्हा परिषदेची पेठामरापूर शाखा देखील सुरू झाली आहे. या शाळेच्या बाजूला तर अतिक्रमण करून पक्के घर बांधले आहे. मुख्याध्यापक, गट साधन केंद्रातील गटशिक्षणाधिकारी व अन्य कर्मचारी यांच्या दुर्लक्षामुळे दिवसेंदिवस अतिक्रमण वाढत चालले होते.

गटशिक्षणाधिकारी यांनी मुख्याधिकारी, उपविभागीय अधिकारी, गटविकास अधिकारी यांच्याकडे पत्र पाठवून शाळा परिसरातील अतिक्रमण हटविण्याची विनंती केली. त्यानुसार ६ मार्च रोजी सकाळी ९ वाजता नगर परिषदेचे मुख्याधिकारी तानाजी चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता निरीक्षक गौरव कुमार जाधव, सिद्धार्थ वाघमारे, तुकाराम पाडले, मिर्झा असद बेग, लक्ष्मण कांबळे आणि अनेक कर्मचारी सर्व साहित्य व बुलडोझरसह घटनास्थळी

उपस्थित झाले. त्याचबरोबर देगलूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मारोती मुंडे, सपोनि अश्रुदेव पवार, पोलीस उपनिरीक्षक नरहरी फड, सहाय्यक फौजदार किरण कुलकर्णी यांच्यासह २५ अंमलदार आणि ५० होमगार्ड घटनास्थळी उपस्थित झाले. नगरपरिषद व पोलीस प्रशासनाच्या संयुक्त कारवाईतून जिल्हा परिषद शाळेसमोरील अतिक्रमण हटविण्यास सुरुवात झाली आहे. याप्रसंगी काही अतिक्रमणधारकाने स्वतः पुढाकार घेऊन आपापली अतिक्रमणे काढून घेतली.

# लोकप्रशासन विषयात विद्यापीठात पदवी स्तरावर सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास मिळणार सुवर्णपदक

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या चारही जिल्ह्यातील लोकप्रशासन विषयात च्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढ व्हावी या दृष्टीने लोकप्रशासन अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रोफेसर डॉ एम आए शेख आणि अभ्यास मंडळाचे सर्व सदस्य यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबवण्यात आला आहे लोकप्रशासन या विषयात सुवर्णपदक असावे असा खूप दिवसापासून ध्यास होता नांदेड लातूर परभणी आणि हिंगोली या चारही जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढवी या दृष्टीने लोकप्रशासन विषयाच्या सर्व प्राध्यापकांनी आणि अभ्यास मंडळाच्या सर्व सदस्यांनी लोकसहभागातून एक लाख एकावन्न हजाराचा निधी लोकप्रशासन विषयाचे सर्व प्राध्यापक सेवानिवृत्त प्राध्यापक माजी विद्यार्थ्यांद्वारे गोळा केला निधी संकलनाचे प्रमुख डॉ बाळासाहेब भिंगोले व डॉ बालाजी कत्तुरवार यांच्याकडे जमा करून सदरील रक्कम स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे सन्माननीय प्र.कुलगुरु डॉ. अशोक महाजन यांच्याकडे देण्यात आली आहे या शिवाय लोकप्रशासन अभ्यास मंडळाद्वारे सातत्याने विद्यार्थी विकासाभिमुख अनेक उपक्रम राबवले जात आहेत अभ्यास मंडळामार्फत बी ए प्रथम वर्षाच्या



विद्यार्थ्याकरिता आतापर्यंत एकूण तीन क्रमिक पुस्तकाचे विषयातील तज्ञ लेखकाच्या मदतीने संपादन करण्यात आले आहे तसेच बहिस्थ एम ए प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्याकरिता एकूण नऊ पुस्तकाचे लेखन साहित्य उपलब्ध करून दिले आहे भविष्यात असेच नवनवीन उपक्रम अभ्यास मंडळाचे वतीने राबवली जातील सदरील कार्यासाठी लोकप्रशासन अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ शंकर लेखने, डॉ मुक्ता सोमोवशी, डॉ बालाजी कत्तुरवार, डॉ बाळासाहेब भिंगोले, डॉ. संजय देबडे, डॉ चांदोबा कहाळेकर, डॉ अमोल काळे तसेच लोकप्रशासन विषयातील प्राध्यापक संशोधक तासिका तत्त्वावरील प्राध्यापक आणि विषयावर प्रेम करणारी प्राचार्य सेवानिवृत्त प्राध्यापक यांनी विशेष प्रयत्न केले



# ती अंतर्मुख

लोकनेता न्यूज नेटवर्क

आज तुझ्या कार्याचा वेगवेगळ्या नावांनी उदो उदो होतोय .ती ललना, ती चंडिका, ती त्यागमूर्ती, वात्सल्य सिंधू,ती अंबिका की निर्भया अशी कितीतरी नावे तुला दिली जातात. सगळीकडे स्त्रीत्वाचे गुणगान गायिले जाते. मोठ्याल्या स्टेजवर हारतुऱ्यांनी आज तुझ्या स्त्रीत्वाचा सत्कार केला जातो . तुझ्यातल्या बाईपणाचा आदीकालापासून तो आतापर्यंतचा प्रवास मांडला जातो. समाज व्यवस्थेने तिच्यावर लाधलेली बंधने, जोखंड, तिन्ही सोसलेल्या यातना, केलेला त्याग,तिचा संघर्षातूनच तावून सुलाखून झालेला प्रवास, तिच्या मनाची आभाळाएवढी विशालता, तिच्या अस्तित्वासाठी अनेकांनी उभारलेला लढा.कठीण प्रसंगांना तोंड देऊन निर्भयपणे उभी राहिलेली ती, कालानुरूप तिला मिळालेले स्वातंत्र्य, तिने प्रादंक्रांत केलेली विविध क्षेत्रे,अशा विविध विषयावर हा दिवस गाजत असतो. अगदी या दिवशी तुला आपल्या अवतीभवतीचे अवकाश कवेत आल्यासारखं वाटत असेल ना. वर्षातून एक दिवस तरी माझा दिवस येतो याचा तुला कौतुक वाटत असेल ना.पण हे वास्तव आहे का भास याचं अजून तुलाच कोडं उलगडले नाही.आजही कोण्या माळरानावर ती पाण्याच्या शोधात डोकीवर हंडा घेऊन कित्येक मैल पायपीट करते आहे. विटभट्टीवर कष्टाने रापलेली ती डोकीवर विटांचे ओझे वाहतेआहे.त्यातून अनेकांची स्वप्ने उभी राहत असतील पण तिचा तान्हूला कान्हा आईचे दूध प्राशन करण्यासाठी आसूसलेला आहे. तो भुकेने टाहो फोडतो आहे पण त्याला जवळ घेऊन छातीशी कवटाळावे त्याची भूक भागवावी इतकाही निवांतपणा तिला मिळू शकत नाही .कित्येकींना बरबटलेल्या दुर्गंधीच्या खाईत ढकलून वासनांद, नराधम तिच्या शरीराचे लचके तोडतात . पोटाची खळगी भरण्यासाठी त्या या यातना, दुःख निमूटपणे सहन करतात . मनात प्रश्न येतो की आजचा दिवसाचे महत्व तिला ठाऊक असेल का? महिला दिन, स्त्री स्वातंत्र्य याविषयी तिला पुसटशी तरी कल्पना असेल का? त्या अंधारात कधी थोडा तरी उजेडाचा कवडसा देणारी पणती कधी पेटेल कुणास ठाऊक.

आयुष्यभर दुसऱ्यासाठी जगणाऱ्या तिच्यावर मात्र जेव्हा वैधव्याची वेळ येते तेव्हा,तिचं जगणं बदलून जातं. जणू नटणं मुरडणं आणि वावरण्याचं स्वातंत्र्यच तिच्याकडुन हिरावून घेतलं जातं. काही कारणामुळे ही परितक्त्या होते.तेव्हा तिचा स्वीकार पूर्वीसारखाच तिच्या माहेरी केला जातो का? नकोशी असणारी तिला घरातूनच शब्दांच्या वेदनांचे चटके दिले जातात. अगदी जवळची रक्ता मासाची माणसेही तिला समजून घेत नाही.तेव्हा ती वेदना ती कोणासमोर बोलणार?

खरंतर आधी तीनच तिला समजून घ्यायला हवं. तिच्या मनीची वेदना जाणून घ्यायला हवी. तिच्यासाठी फार काही नाही करता आलं तर वेदनेवर थोडी तरी फुंकर घालता यायला हवी. तिच्या पांढऱ्या फकट कपाळावर आपल्या हाताने कुंकू लावायला हवं.तिची आनंदाने ओटी भरायला हवी. तो तिला सोडून गेला असेल आयुष्याच्या अवघड वळणावर. पण तिनंच तिला विश्वासाचा हात हाती द्यायला हवा.तिला नव्याने उभारण्याची ताकद आणि आत्मविश्वास द्यायला हवा 'मी आहे ना 'हे शब्दही तिच्यासाठी पुरेसे असतात. कदाचित या शब्दांनी तिच्यात नवे बळ येऊन ती स्वतःला सिद्ध करून दाखवेल. तिच्यावर होणाऱ्या अन्याय आणि अत्याचाराची जाणीव तिला निर्माण व्हावी.तिच्यावर लादला जाणाऱ्या कूप्रथांचा तिला कडाडून विरोध करता यायला हवा. एवढी ती विचाराने व मनानी सक्षम व्हायला हवी. इतरांसाठी जगता जगता थोडं स्वतःसाठीही जगता यायला हवं.आपल्या आवडीनिवडी छंद यांना प्राधान्य देता यायला हवं.तरच खऱ्या अर्थाने महिला दिन साजरा होईल. महिला दिन हा एकच दिवस तिच्यासाठीचा नसावा.रोजच्या जगण्यातला प्रत्येक दिवस भयमुक्त, विश्वास, आत्मबल वाढविणारा असावा.

लेखिका –रंजना सानप
मायणी (सातारा )
मो.नं.९०४९५४८३२३

## ती आणि तो




किती काळ लोटतो तेंव्हा
त्याला तिची थोडी जाणीव होते
अन ती वेडी लगेच कशी
आनंदाने फुलूनी जाते.....

दबूनी राहतात मनीच्या इच्छा
तरीही रांगोळी रेखाटत राहते
उधळीत जातो तो फुले अन
त्याच आरशात स्वतःला पाहते...

दिवस त्याचा अन रात्रही त्याचीच
तरीही कुठेच कुरबूर नसते
त्याची तृप्तीची ढेकर ऐकून
समाधानी ती गालात हसते...

घर गच्च भरले तरी
कशावरही तिचा दावा नसतो
कष्टत राहते रात्रंदिवस
तिचाच विश्वास केव्हातरी फसतो..

सोसत जाते भोगत राहते
भिंतीजवळ बाईपणाचे गाणे गाते
सांधीत राहते ठिगळाने जखमा अन
त्याच प्रवाहात सुखाने वाहते.

–रंजना सानप
मायणी (सातारा )
मो.नं–९०४९५४८३२३

# स्त्री:माता तू,शक्ती तू,जीवन दायिनी!

लोकनेता न्यूज नेटवर्क

स्त्री म्हणजे जन्म! स्त्री म्हणजे वात्सल्य, प्रेम, जिव्हाळा! स्त्री म्हणजे सौंदर्य! स्त्री म्हणजे क्रांती, स्त्री म्हणजे शांती! स्त्री म्हणजे नवनिर्माण! स्त्री म्हणजे जगण्याचे भान आणि जाण! स्त्री म्हणजे शक्ती! स्त्री म्हणजे भक्ती! स्त्री म्हणजे जीव धोक्यात घालून जगाला उपजवीणारी जगतजननी! स्त्री म्हणजे स्वच्छता! स्त्री म्हणजे माय, बहिण, पत्नी, कन्या आणि मैत्रीण सुद्धा! स्त्री म्हणजे घरपण आणि घरादाराचं दर्पण! स्त्री म्हणजे सर्वार्थाने सपर्पण! स्त्री म्हणजे डॉक्टर, स्त्री म्हणजे पहिला मास्तर (शिक्षक)! ती खडकावर मरूद्यान फुलवते, जीवाला जीव लावून घर तळहातावर झुलवते! तिच्यामुळेच आहेत भोवताल फिरणारी माणसं, तिनेच पहिल्यांदा उगवलेत वावरात कणसं! स्त्री म्हणजेच महामाणूस! आज आंतरराष्ट्रीय स्त्री दिनानिमित्त सर्वत्र स्त्रीचे गुणगान होतांना तिची गरिमा तेजोमय करण्यासाठी सर्वोपरी प्रयत्न केले जात आहेत, ही मोठी अभिमानाची बाब!

माय–बापहो, स्त्रीचा इतिहास मोठा देदिप्यमान आहे. मानवाच्या जन्माच्या विविध मिथकामध्ये तिला पुरुषापासून निर्माण केलेले दाखवले असले तरी; त्याला तर्कशुद्ध अधिष्ठान नाही. तिच्या निर्मितीच्या गोष्टी काहीही असो, मात्र तिने केलेल्या नवनिर्माणाच्या कथा मात्र थक्क करणाऱ्या आहेत. स्त्रीला पटलावरून पुसून टाकण्याचा अनेकवेळा प्रयत्न झाला असला तरी तिच्या कार्य कर्तृत्वाने तिच्या उज्वल इतिहासाची पाने जगाला आजही तेवढाच लख्ख उजेड देत आहेत. इतिहासात अनेक धुरंधर स्त्रियांनी फक्त घरकामादी क्षेत्र गाजवले नसून केवळ सौंदर्यच नव्हे तर पुरुषाच्या बरोबरीने युद्ध, शस्त्रास्त्र, बुद्धीचातुर्य, वाक्चातुर्य इत्यादी महत्वपूर्ण क्षेत्रात आपली ऐतिहासिक छाप सोडली आहे. अगदी पुराणातील गार्गी, मैत्रेयी पासून ते विद्यमान राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्यापर्यंत ती जीवनाच्या पटलावर पाय रोवून खंबीरपणे उभी आहे! प्रतारणा, उपेक्षा, छळ इत्यादीच्या बाबतीत पुरुष नावाच्या प्राण्याने मात्र तिच्या बाबतीत कळस गाठला आहे. इतिहासात स्त्री प्रधान संस्कृतीत ती एकदम केंद्रस्थानी होती. पती–पत्नी नावाची संकल्पना नसतांना स्त्री सर्वार्थाने स्वतंत्र होती. घर चालवणे एवढे क्षुल्लक काम तिच्यासाठी गौण होते. तिनेच इथल्या शेतीचा आणि विविध बि बियाण्यांचा शोध लावला. गाय, म्हैस, शेळीचे दुध माणसाला उपयोगी असून, या प्राण्यांना मायेने आपलेसे करून अगोदर अंगावरील आणि नंतर प्राण्यांचे दुध पाजून पुरुष नावाच्या प्राण्याला जगविले. ती सर्वप्रथम आणि शेवटीही सर्वांची आईच आहे!

जगात स्त्री प्रधान संस्कृतीने स्त्रीची जडणघडण मोठ्या ताकदीने झाली. काळाच्या पटलावर तिच्या पावलांचे ठसे आजही तेवढेच स्पष्ट आहेत. स्त्रीचा इतिहास मात्र मोठा भयंकर आहे. पूर्व वैदिक काळात केंद्रस्थानी असणारी स्त्री उत्तर वैदिक काळात बंदिस्त केली. स्त्रीसत्ताक बदलून परुष सत्ताक कुटुंब पद्धती रूढ झाली. पुरुषाने आडदांडपणाने स्त्रीला बंदिस्त केले. कर्मव्यवस्था बदलून वर्णव्यवस्था रुजवली. मनुस्मृती सारखे भेद निर्माण करणारे अमंगळ ग्रंथ पुढे आले. वर्ण व्यवस्था कठोर झाली. केंद्रस्थानी, मालकीण असणारी स्त्री वर्णव्यवस्थेने गुलाम बनली, अतिशूद्र गणली जाऊ लागली. पुरुषाची उपभोग्य वस्तू, सबलाची अबला केली. एवढेच काय स्त्री विनिमयाचे साधन बनली. मग पदर, नंतर घोषा आणि शेवटी सती प्रथेने ती पूर्णतः संपवली. येणाऱ्या पिढीतील स्त्रियांना या बाबींचा प्रचंड त्रास भोगावा लागला. हे सर्व बदलायला शेकडो वर्षे जावी लागली. सतराव्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांचा उदय झाला आणि स्त्री सुरक्षित झाली. जिजाऊ आईसाहेबांनी स्त्री आणि शेतकरी सुरक्षेसाठी शिवबांना तयार केले. कुळी कन्यापुत्र होती जे सात्विक सारखे स्त्री स्वातंत्र्य आणि सुरक्षेबाबत अभंग लिहून थोतांड, कर्मकांड, देवभोळेपणा, वर्णव्यवस्थेला कडाडून विरोध करत समाजाला योग्य दिशा देण्याचे कार्य तुकोबांच्या अभंगांनी केले. मराठी सत्तेचा अस्त होऊन पुन्हा पेशवाई आणि ब्रिटीश सत्तांनी धुमाकूळ घातला. त्यासाठी एकोणिसावे शतक उजाडावे लागले. ज्योतीराव–सावित्रीबाई या फुले दांपत्याने खऱ्या अर्थाने स्त्री शिक्षण आणि स्वातंत्र्याकरिता व्यवस्थेविरुद्ध दंड थोपटले. ब्राह्मणी वर्णव्यवस्थेला आव्हान दिले. एवढेच काय, पुण्यासारख्या सनातनी गावात मुलींची पहिली शाळा सुरु करून कृतीशील क्रांतीचे रणसिंग फुंकले. ब्राह्मणांचे कसब, सत्सार, गुलामगिरी, शेतकऱ्यांचा आसूड सारखे सडेतोड ग्रंथ लिहून प्रस्थापित व्यवस्थेला हादरे दिले. सार्वजनिक सत्यधर्म, सत्यशोधक समाज आदि विचारसरणी रूढ करून थोतांड, कर्मकांडाला तिलांजली देण्याचा विचार रुजवला. स्त्रीला स्वातंत्र्य मिळायला प्रारंभ झाला.



त्याच काळात राजर्षी शाहू महाराजांनी आरक्षण आणि स्त्री सुधारणा राबवून आपली वेगळी, क्रांतिकारी ओळख निर्माण केली. पुढे स्त्री स्वातंत्र्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लेखन–भाषणाने कृतीशील कार्य केले. त्यांतर भारताला स्वातंत्र्य मिळाले. बाबासाहेबांनी भारतीय संविधानात स्त्रीला अनन्यसाधारण महत्त्व देतांना स्त्री–पुरुष समानता तत्व प्रकर्षाने रुजविले आणि खऱ्या अर्थाने ती पुन्हा स्वतंत्र झाली.

आज आपण संसदीय लोकशाहीची ७५ वर्षे ओलांडून शतकाकडे वाटचाल करत आहोत. देशाच्या सर्वांगीण विकासात स्त्रीचे योगदान अनन्यसाधारण आहे. पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून आज ती प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर झाली आहे. असे असले तरी जागतिक डब्ल्यू.एच.ओ.अहवालानुसार दररोज सरासरी ८०० स्त्रिया बाळंतपण आणि तत्सम बाबींमुळे मृत्यूला कवटाळतात. ही मोठी चिंतेची आणि विचार करण्याची गोष्ट आहे. त्यासाठी आज समाजात मोठ्या प्रमाणात जागृतीची गरज आहे. देशात सर्वत्र बालविवाहाचे कडक कायदे असतांना देशातील बालविवाह रोखण्यात इथली सरकारे अयशस्वी ठरली आहेत. आजही देशात मुलींचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाचे प्रमाण म्हणावे तेवढे वाढले नाही. बारावी नंतर उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींची आकडेवारी पाहिली असता ही देशाची चिंता वाढवणारी बाब आहे. एकूण सरासरी १०० मुलींच्या मागे केवळ २० ते २४ टक्केच मुली पदवी शिक्षणापर्यंत पोहचत आहेत. ही आकडेवारी काय सांगते आहे? उर्वरित ८० ते ८६ टक्के मुली कुठे जातात? याचे उत्तर म्हणजे समाज त्यांच्यावर लग्न करून अकाली मातृत्व लादतो आहे. आजही समाज मुलीकडे एक माणूस म्हणून पहायला तयार नाही. ग्रामीण भारतात १४ ते १६ वय झालेल्या अल्पवयीन मुली आई–वडिलांना कुटुंबावर भार वाटतात. समाज मुलींना चूल आणि मुल, वाढा–रांधा–उष्टी काढा या पलीकडे पहायला आणि जाऊ द्यायला तयार नाही. इथली समाज व्यवस्थाच जर अशा जुनाट, रूढी–परंपरावादी बुरसटलेल्या विचारांनी ग्रस्त असेल तर स्त्रीचा उत्कर्ष कसा होणार?

माय–बापहो, आज समाजाला उच्च शिक्षित स्त्रियांची नितांत गरज आहे. गर्भात खुडलेल्या कळ्यांचा तळतळाट समाज आज भोगत आहे. गावोगाव शेकडो अविवाहित तरुण सैराट फिरत आहेत. वंशाच्या दिव्याला वातच मिळाली नाही तर ज्योत कशी पेटणार? यासाठी आज समाजात शिक्षणाचे मूळ रुजवावे लागणार आहे. पदवी पूर्ण झाल्याशिवाय विवाह थांबवतांना हुंडा बंदच झाला पाहिजे. सुरक्षा वाढवून तिला शाळा–महाविद्यालयापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी प्रत्येकाला उचलावी लागेल. स्त्री शिकली तरच येणारा काळ सुकर होणार आहे, अन्यथा समाजाची अवस्था कठीण होईल! तेंव्हा चला, आपली आई, बहिण, पत्नी, कन्या, मैत्रीण इत्यादी शक्तीला बळ देऊन देश शक्तिशाली करूया!

प्रा.डॉ.विठ्ठल खंडुजी जायभाये
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय,सोनपेठ
जि. परभणी (महाराष्ट्र)
मो.९१५८०६४०६८

# एका कंकणात तिच्या अवघे विश्व सामावले

लोकनेता न्यूज नेटवर्क

यत्र नार्यस्तू पुज्यंते , रमन्ते तत्र देवता: भारतीय संस्कृतीमध्ये नारीला अन्यन्य साधारण महत्त्व आहे. ज्या ठिकाणी नारीला सन्मान दिला जातो,त्या ठिकाणी साक्षात देवता वास करतात असे म्हटले जाते. हे असे असून देखील स्त्रियांना आजही समाजात दुय्यम स्थान दिले जाते . त्यांच्या कर्तुत्वावर आजही समाज साशंक आहे . प्रत्येक वेळी अग्नी परीक्षा ही स्त्रीचीच घेतली जाते . अशावेळी नको हा स्त्रीचा जन्म असं मनात येत. स्त्रीला नेहमी त्यागाची मूर्ती म्हटल्या जाते. त्याग तिने एकटीनेच करायचा का? घर, संसार, कर्तव्य बजावत असताना ती कुठे कमी पडते का ?असं कोणत क्षेत्र आहे जिथे अजूनही ती पोहोचली नाही? शिक्षण, राजकारण , सेवा , अंतरिक्ष, नोकरी, समाजकारण अशा सर्व क्षेत्रात तिने स्वतःला सिद्ध केलं. आम्ही कुठेही कमी नाहीत हे जगाला दाखवून दिल . जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उद्धारी हे सिद्ध करताना पाळण्याची दोरी एका हातात धरून ती ज्याप्रमाणे तुम्हाला घडवते, संस्कार करते त्याप्रमाणे दुसऱ्या हाताने ती अवघ विश्व आपलंसं करते. तिच्या कंकणाच्या आकारातच अवघ विश्व सामावले आहे. मुलीचा गर्भ पोटात आहे असं समजताच गर्भपातासारखं महापातक करायला लावणारा समाज आज स्वतःच्या मुलालाच बायको मिळवण्यासाठी धडपडतोय. किती ही शोकांतिका? स्त्रीने कितीही शिकल, सवरलं , स्वतःला सिद्ध केलं तरी आजही तिचे अस्तित्व स्वीकारायला समाजच काय पण तिच्या स्वतःच्या घरचे सुद्धा तयार होत नाहीत . ही मानसिकता कुठेतरी बदलायला हवी. आजही स्त्रियांवर अत्याचार , बलात्कार होताना आपण पाहतोय . अल्पवयीन मुलींपासून ते वयोवृद्ध मातेसमान महिलांनाही हे नराधम आपली शिकार बनवतात . त्यामुळे आजही मनात म्हणावेसे वाटते अरे ! रावणाच्या अशोकवनात तरी सीता सुरक्षित होती! आपण रावणाला दोष देतो पण रावण हा किती तरी पटीने चांगला होता. स्वतःच्या बहिणीचा बदला घेण्यासाठी सीतेचे अपहरण त्यांनी केले असेल, पणं सीतेच्या केसाला देखील त्याने स्पर्श केला नाही. दिल्लीतील निर्भया प्रकरणाची धग ज्वलंत असतानाच बदलापूरची घटना घडते , कालची पुण्यातील घटना असेल हे ऐकलं, वाचलं की मन सुन्न होत आणि मनाला वाटते रावणाची अशोक वाटिका तरी बरी ..! किती दिवस, अजून किती दिवस तिने हे सहन करायच? किती दिवस स्वतःला सिद्ध करत बसायचं? शेवटी तीही एक व्यक्ती आहे तिला ही मन आहे. तिच्या मनाचा विचार तो कोण करणार? सगळ्यांसाठी करता करता ती स्वतःला देखील विसरून जाते. अवघ आयुष्य ती इतरांसाठी समर्पित करते. तिच्या समर्पणाची बरोबरी करायला अवघं अवकाशही कमी पडेल. सागराची अथांगता, आकाशाची विशालता , पृथ्वीची कणखरता तिच्या ठाई ठाई आपणास दिसून येते. नऊ महिने गर्भ ती पोटात वाढवून स्वतःचा जीव पणास लावून तुम्हाला जन्म देते , एक नवीन आयुष्य तुम्हास अर्पण करते. हे आयुष्य म्हणजे स्त्रीने आपणास दिलेली सर्वात सुंदर भेट आहे. लहानपणी आपलं बोट धरून चालणारी मुलगी पुढे आई–वडिलांचा आधार बनते, कुणाची तरी सून बनते , कुणाची तरी अर्धांगी निबंध, रक्षण करण्यासाठी मनगटात बळ येऊ दे म्हणून राखी बांधते . अशी एक नव्हे अनंत भूमिका ती उत्कृष्टपणे पार पडते . कितीही संकटे आली तरी धडपडते, सावरते व पुन्हा उभी राहते. अशावेळी त्या स्त्रीला दोन शब्द प्रेमाचे ऐकावेसे वाटतात . तिचं मन भरून कौतुक नाही केलं तरी चालेल पण कणभर अपमान तरी करू नका. ती सक्षम आहे सर्व पार पाडायला, फक्त तिला विश्वास बना. सुनीता विल्यम्स, कल्पना चावला सारखं अवघं आकाश तिने कवेत घेतलच आहे फक्त तिला आता थांबवू नका . तिच्या स्वप्नांना आकांक्षाचे पंख लावा. तुमच्या सुखाच्या व दुःखाच्या क्षणी जिने तुम्हाला सावरलं, उभं केलं तिच्या आयुष्यात आनंदाचे दोन क्षण देण्याचा प्रयत्न करा. महिला दिनानिमित्त एक दिवस तिची थोरवी, गोडवे गाऊन तिला सत्कारमूर्ती बनवण्यापेक्षा खऱ्या अर्थाने तिच्या सुखदुःखाचे भागीदार व्हा . नकोय तिला कुणाचे उसने उपकार कारण ती आता खूप सक्षम झाली आहे . रणांगणावर झाशीची राणी बनून ती शत्रूचा थरकाप उडवू शकते, द्रौपदी मुर्मु बनून ती अख्खा देश सांभाळू शकते, सौंदर्यांची खान तर ती आहेच पणं मातृत्वाची देवता आहे, फुलासारखी नाजूक आहेच पणं काट्यासारखी कणखर आहे, चंद्राच्या शितलते बरोबर सूर्याची धगही तिच्यात आहे. तुम्ही काय तिला फुलं देणार ती स्वतःच एक बगीचा आहे. फक्त आता आवश्यकता आहे तिच्या अस्तित्वाचा सन्मान करण्याची, तीच अस्तित्व मोठ्या अभिमानाने स्वीकारण्याची. शेवटी एवढेच म्हणेन,

**वार नाही तलवार आहे**
**ती समशेरची धार आहे**
**स्त्री म्हणजे काही राख नाही**
**तर धगधगता अंगार आहे.**



लक्ष्मी विठ्ठलराव पांडागळे
(नांदेडे) सहशिक्षिका
अशोक प्राथमिक व माध्यमिक
विद्यालय ,विष्णूनगर,नांदेड



# बेघर रोज तीळ तीळ मरत असतो, न राहवून रस्ते त्याच्या अपघाती सुटकेची सूक्ते रचतात ;वाघोलीतील भयाण वास्तव

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**वाघोली । संतोष कदम**



उन्हें रात्रीही सरत नसतात, गरम झालेले फुटपाथ बेघरांची पाठ शेकत असतात बेघर भिकारी मजबूर असतात, दिवसभर तारवटलेले डोळे मिटून घेतात पण काही केल्या झोप येत नाही..त्यांची घालमेल पाहून रडवेलं झालेलं चांदणं त्यांच्या उशाला येऊन बसतं, डोकं तरी थंड व्हावं म्हणून..
रात्री बऱ्याच उशिरा भिकारी झोपी जातात, निर्मनुष्य रस्ते अधिकच सुनसान वाटू लागतात.
भिकाऱ्यांचे मंद निश्वास वाऱ्यासोबत वाहत राहतात, त्यांत असतो घामेजल्या अश्रूंचा गंध !
त्याच्या दरवळाने धूळभरल्या पानांत गायीचे डोळे उगवतात, जे दिवस उगवताच अस्तास जातात...
भिकारी रोज तीळ तीळ मरत असतात, न राहवून रस्ते त्यांच्या अपघाती सुटकेची सूक्ते रचतात !
लेखक समीर गायकवाड यांची ही कविता म्हणजे पुण्याच्या वाघोली येथील फुटपाथवर आसरा घेतलेल्या ज्या ९ जणांना डंपरने चिरडलं त्यांचा आक्रोश होता .अमरावतीवरून कामासाठी पुण्यातील वाघोली येथे आलेल्या ९ जणांना वाघोली केसनंद फाटा परिसरात काही महिन्यापूर्वी मध्यरात्रीच्या सुमारास मद्यधुंद अवस्थेत असलेल्या डंपर चालकाने चिरडलं होते . पुण्यात काम शोधण्यासाठी आलेल्या या कामगारांनी फुटपाथवर आसरा घेतला होता. पण भरधाव वेगाने आलेल्या डंपरने ९ जणांना चिरडले. यामध्ये ३ जणांचा मृत्यू झाला.तर ६ जण गंभीर जखमी झाले होते . मृतांमध्ये एक आणि दोन वर्षांच्या चिमुकल्यांचा समावेश होता .सांगायचे तात्पर्य घटना घडून गेली, ज्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला ते अजूनही शॉक मध्ये असतील, परंतु त्यानंतर प्रशासनाने अशा घटना घडू नये म्हणून काय पावले उचलली हा प्रश्न पडतो. कारण आजही या फुटपाथवर बेघर मजूर झोपलेले पाहायला मिळतात. म्हणजे घटना घडली की दोन दिवस याचा प्रशासनाकडून उहापोह होतो. आश्वासने दिली जातात. त्यानंतर सर्व काही सुरळीत झाले की लोकांना अशा घटनाचा विसर पडतो. पण आजही इथे झोपलेले लोक नक्कीच जीव मुठीत घेऊन झोपलेले असतील. यांच्या व्यवस्थेचा प्रश्न मात्र अनुत्तरीत राहतो. बर हे मजूर ज्या ठिकाणी झोपतात तिथून पोलीस स्टेशन हाकेच्या अंतरावर आहे. मग यांना घडून गेलेल्या गोष्टीची आठवण येत नसेल का.. आणि येत असेल तर या मजुरांना या ठिकाणी झोपून देणे किती योग्य आहे यांचा विचार पोलिसांनी करणे गरजेचे आहे. आणि यावर काही करायचेच नसेल तर दुसरी घटना घडण्याची आपण वाट पाहत आहोत का असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकाला पडतो. वाघोलीतील या मजूरांसाठीचा प्रश्न प्रशासनाने मार्गी लावण्याची गरज आहे असे राहून राहून वाटते.

> **" शहरात तर उघड्यावर झोपण्याची वेळ आली. गावाकडेही उघड्यावरच होतो आणि इथेही उघड्यावरच राहत आहे. रस्त्याच्या कडेला राहतो तरी महानगरपालिकेची लोक त्रास देतात. तुम्ही स्वच्छ राहत नाही, रस्त्यावर घाण करता, असं बोलून जातात. रस्त्याच्या कडेला असलेल्या खांबावरच्या लाईटमुळे आमच्या झोपड्यात प्रकाश पडतो नाहीतर लाईट गेली की आम्ही अंधारात झोपतो. हे कोणाला दिसत नाही का ?**
>
> **– एक हतबल मजूर, वाघोली, पुणे.**

# पवित्र रमजान मध्ये शहरातील अतिक्रमणास तात्पुरती स्थगिती देण्यात यावी–संभाजी ब्रिगेड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**निलंगा । इस्माईल महेबूब शेख**



मानवतेचा संदेश देणारा पवित्र रमजानच्या महिन्यात फळ,फ्रुट हात गाड्यावर कारवाई अर्थात अतिक्रमण तात्पुरती स्थगिती देण्यात यावी अशा मागणीचे निवेदन संभाजी ब्रिगेडच्या वतीने उपविभागीय अधिकारी यांना संभाजी ब्रिगेडचे तालुका अध्यक्ष प्रमोद कदम यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले.

याबाबत सविस्तर माहिती अशी कीमुस्लिम धर्मामध्ये रमजान चा महिना पवित्रु मानलं जातो. मानवतेचा संदेश देणारा हा पवित्र महिना असल्याने मुस्लिम समाजातील गरीब व छोटे व्यापारी आपला कुटुंबाचा उदरनिर्वाह व उपजीविका भावण्यासाठी फळ,फ्रुट व इतर खाण्याचे पदार्थ विक्री करतात.निलंगा शहरांत सर्व समाज एकमेकांच्या सणात गुण्यागोविंदाने हिरीहरीने सहभागी राहत असतो. हिंदू–मुस्लिम ऐक्याचे दर्शन अनेकवेळा निलंगा शहरातील जनतेने महाराष्ट्राला दिले आहे. आम्ही मुस्लिम समाजाच्या पवित्र रमजान चा आदर करत आपणांस विनंती करतो की,नगर पालिकेच्या माध्यमातून होणारा अतिक्रमण मोहीम हे पवित्र रमजान चा महिना लक्षात घेता तात्पुरती स्थगिती द्यावी. जेणेकरून खर्चीक असलेला आणि गरीब मुस्लिम समाजातील लोकांना आपला छोटा व्यापार करून या रमजानच्या महिन्यात आपल्या व कुटुंबाची उदरनिर्वाह व उपजीविका भागवता येईल. आम्ही अतिक्रमण मोहीम कायमस्वरूपी स्थगिती द्यावी असे आमचे अजिबात म्हणने नाही,कायद्यानुसार आपण ती कारवाई करावीच. मात्र सदरील पवित्र रमजान चा महिना लोकांची भावना, गरीब मुस्लिम समाजातील छोटे व्यापारी यांच्या व्यथा लक्षात घेऊन किमान मानवतेचा संदेश देणारा पवित्र रमजान महिन्या पर्यंत होणारी नगर पालिकेच्या माध्यमातून अतिक्रमण मोहीम तात्पुरती स्थगित करून सहकार्य करावे अशा मागणीचे निवेदन येथील उपविभागीय अधिकारी यांना देण्यात आले आहे.यानिवेदनावर संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष प्रमोद कदम, तालुका सहसचिव कुणाल पाटील, शहराध्यक्ष परमेश्वर बोधले,संघटक परमेश्वर जाधव,सिद्धनाथ बळीराम जाधव आदि संभाजी ब्रिगेडच्या पदाधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# जिजाऊ ब्रिगेड तालुकाध्यक्ष पदी सौं.जयश्री अडकीने



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**माहूर । राजकिरण देशमुख**

मराठा सेवा संघ प्रणित जिजाऊ ब्रिगेड च्या माहूर तालुकाध्यक्ष पदी सौ. जयश्री जयकुमार अडकीने यांची नियुक्ती करण्यात आली. नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष सौ. कल्पना चव्हाण, जिल्हाध्यक्ष नांदेड (दक्षिण) सुमित्रा वडजकर, जिल्हा सचिव, वनिता देवसरकर, अर्चना होगे, जिल्हा कार्याध्यक्ष सुनीता कल्याणकर, वर्षाताई कऱ्हाळे, सुमनबाई कऱ्हाळे ल, मराठा सेवा संघांचे राष्ट्रीय उपाध्यक्ष ज्ञानेश्वर कऱ्हाळे, प्रा. प्रवीण
बिरादार यांची उपस्थिती होती, नियुक्ती बद्दल मराठा सेवा संघ विविध कक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यानीं अभिनंदन केले आहे..

# सोमवारी मातोश्री भीमाई व्याख्यानमालेचे तेरावे पुष्प

## 'ताणतणावाचे व्यवस्थापन' या विषयावर प्रा.श्रीहरी वेदपाठक यांचे व्याख्यान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड । शिवकुमार बिरादार**



मुखेड: कै. सौ. भीमाबाई पांडुरंगराव पुंडे स्मृती, मातोश्री भीमाई व्याख्यानमाला व गुरुवर्य पांडुरंग पांडुरंगराव पुंडे स्मृती पुरस्कार प्रदान सोहळा सोमवार दि. १० मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता शांतीनगर मुखेड येथे आयोजित केले आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुसदचे ज्येष्ठ समाजसेवक प्रा. नारायणराव क्षिरसागर राहणार असून यावेळी नांदेड येथील ज्येष्ठ समाजसेवक एडवोकेट दिलीप ठाकूर यांना गुरुवर्य पांडुरंगराव पुंडे स्मृती पुरस्कार देण्यात येणार आहे. जागतिक दर्जाचे ससर्पदंश चिकित्सक मुखेड भूषण डॉ. दिलीपराव पुंडे यांच्या संकल्पनेतून मातोश्री भीमाई व्याख्यानमाला सुरू आहे. त्याचे तेरावे पुष्प लातूर येथील सुप्रसिद्ध वक्ते प्रा. श्रीहरी वेदपाठक हे 'तानतणावाचे व्यवस्थापन' या विषयावर व्याख्यान पुष्प गुंफणार आहेत.

डॉ. दिलीपराव पुंडे यांच्या सुवर्ण महोत्सवी वाढदिवसानिमित्त दि.११ नोव्हेंबर २०११ रोजी मुंबई येथील ज्येष्ठ कवी प्रा. प्रशांत मोरे यांच्या आई या विषयावर व्याख्यान संपन्न झाले व भीमाई व्याख्यानमालेचा युगारंभ झाला. मागील एका तपापासून मुखेड व परिसरातील साहित्यिक व प्रेमींना व्याख्यानमालेचा लाभ मिळत आहे. व्याख्यानमालीचे दुसरे पुष्प 'सुंदर जगण्यासाठी' या विषयावर प्रा. डॉ. यशवंत पाटणे (सातारा) यांनी गुंफले. तिसरे पुष्प सातारा येथील डॉ. राजेंद्र पवार यांनी 'सुजाण पालकत्व' या विषयावर गुंतले. चौथे पुष्प 'एकविसाव्या शतकासमोरील आव्हाने' या विषयावर पुणे येथील प्रा. डॉ. तेज निवळीकर यांनी गुंतले. पाचवे पुष्प 'ज्ञानदेवे रचिला पाया.. तुका झालाशी कळस' या विषयावर डॉ. रामचंद्र देखणे पुणे यांनी गुंफले. सहावे पुष्प 'शतायुष्य व्हा, पासवर्ड आरोग्याचा' या विषयावर डॉ.अविनाश सावजी अमरावती यांनी गुफले. सातवे पुष्प डॉ. सचिन देशमुख औरंगाबाद यांनी 'स्वभावालाही औषध असतं' या विषयावर गुंफले. आठवे पुष्प डॉ. जगन्नाथ दीक्षित औरंगाबाद यांनी 'विनासायास वेट लॉस' या विषयावर गुंफले. नवे पुष्प डॉ. श्रीराम राठोड व माजी आयुक्त आर. के. गायकवाड यांनी 'विपश्यना परिचय व अनुभूती' या विषयावर गुंफले. दहावी पुष्प प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे सातारा यांनी जीवन त्यांना कळले हो' या विषयावर गुंफले. अकरावे पुष्प इंद्रजीत देशमुख कराड यांनी 'पसायदान' या विषयावर गुंफले. १२ वे तपपुर्ती व्याख्यान डॉ. आनंद सूर्यवंशी व डॉ. गौरव पुंडे यांनी 'हृदयरोग जनजागरण अभियान' या विषयावर गुंफले तर आज दिनांक १० मार्च रोज सोमवारी सुप्रसिद्ध वक्ते व विचारवंत प्रा. श्रीहरी वेदपाठक हे 'ताणतणावाचे व्यवस्थापन' या विषयावर गुंफणार आहेत. सदरील व्याख्यान पुंडे हॉस्पिटल जवळील शांतीनगर येथील भव्य प्रांगणात होणार असून या व्याख्यानमालेचा लाभ घेण्याचे आवाहन मुखेड भूषण डॉ. दिलीप पुंडे, सौ. माला पुंडे, डॉ. गौरव पुंडे, डॉ. तेजस्विनी पुंडे यांच्यासह भीमाई व्याख्यानमाला संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# अनुसूचित जाती आरक्षण वर्गीकरण करण्याची केली मागणी

## मांगवीरांचा आझाद मैदानावर विराट मोर्चा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**



मातंग व तत्सम तळातील जात समूहातील विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्यासाठी येत्या जून महिन्यापूर्वी महाराष्ट्रात अनुसूचित जाती आरक्षण वर्गीकरण करण्याची मागणी मांगवीर महामोर्चाद्वारे करण्यात आली आहे.लाल सेना व दलित महासंघ यांच्या पुढाकारातून एकत्र येऊन महाराष्ट्रातील २४ संघटनांनी ५ मार्च रोजी शहीद संजय ताकतोडे यांच्या स्मृतिदिनी आझाद मैदान मुंबई येथे 'मांगवीर महामोर्चा' काढला होता.

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून हजारो मांगवीर आझाद मैदानावर महामोर्चात सहभागी झाले होते. महामोर्चाची दखल घेऊन सरकारच्या वतीने जलसंपदा मंत्री नामदार गिरीश महाजन यांनी आझाद मैदानावर येऊन निवेदन स्वीकारले. पाच जून पर्यंत यावर निर्णय घेण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे. याप्रसंगी मंत्री महोदय यांच्या समवेत आमदार अमित गोरखे, आमदार सुनील कांबळे, आमदार देशमुख, आमदार महादेव जानकर, माजी मंत्री दिलीप कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते. मोर्चेकर्यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, अनुसूचित जातीच्या आरक्षणाचा लाभ एक दोन जाती वगळता मातंग सह अनेक जातींना मिळत नसल्याने सर्व वंचित जातींना आरक्षणाचा समान लाभ मिळावा यासाठी मागील दोन वर्षांपासून मातंग समाज सातत्याने आंदोलन करीत आहे.

सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२४ रोजी दविंदरसिंह वि दि स्टेट ऑफ पंजाब या केस मध्ये अनुसूचित जातीतील सर्व जातींना आरक्षणाचा समान लाभ मिळण्याच्या दृष्टीने अनुसूचित जातीच्या आरक्षणात उपवर्गीकरण करण्याचा निर्णय दिला आहे. त्या अनुषंगाने आणि मातंग समाजाची आरक्षण उपवर्गीकरणासाठीची आग्रही मागणी लक्षात घेऊन महायुती सरकारने १५ ऑक्टोबर २०२४ रोजी अनुसूचित जातीचे आरक्षण उपवर्गीकरणाचे प्रारुप निश्चित करण्यासाठी न्यायमूर्ती अनंत बदर समिती नियुक्त केली होती. त्यामुळे मातंग व तत्सम सर्व वंचित जातींनी मागील विधानसभेत महायुतीला भरभरून मतदान केले आहे. परंतु ५ महिणे होऊनही या न्या. बदर समितीचे काम अतिशय संथगतीने सुरू आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाच्या निकालाच्या पार्श्वभूमीवर हरियाणा सरकारने नोव्हेंबर २०२४ पासून आरक्षण उपवर्गीकरणाची अंमलबजावणी सुरू केली आहे तर दक्षिणेतील आंध्रप्रदेश, तेलंगणा आणि कर्नाटक राज्यांनी या महिन्यातील अर्थ संकल्पीय अधिवेशनात अनुसूचित जातीच्या आरक्षण उपवर्गीकरणाचे विधेयक मंजूर करून लागलीच अंमलबजावणी करण्याची तयारी सुरु केली आहे. महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते. या पुरोगामी राज्यात अनुसूचित जातीच्या आरक्षणात उपवर्गीकरण करून सर्व जातींना सामाजिक न्याय देण्याची कार्यवाही सर्वात अगोदर सुरू होणे अपेक्षित होते. परंतु दुर्दैवाने महाराष्ट्र राज्य हे सामाजिक न्यायाच्या प्रक्रियेत खूप मागे आहे. इतर राज्यांप्रमाणे महाराष्ट्रातही या शैक्षणिक वर्षापासून आरक्षण उपवर्गीकरणाची अंमलबजावणी सुरू होऊन मातंग व तत्सम वंचित जातींना न्याय मिळण्यासाठी सरकारने न्या. बदर समिती कडून दोन महिन्यांत आरक्षण उपवर्गीकरणाचा अहवाल घेऊन जून महिन्यापासून आरक्षण उपवर्गीकरणाची अंमलबजावणी सुरू करणे आवश्यक आहे. जर या शैक्षणिक वर्षापासून उपवर्गीकरणाची अंमलबजावणी सुरू केली नाही तर मातंग व तत्सम वंचित जातींचे खूप मोठे नुकसान होणार आहे. सरकार कडून या प्रक्रियेला विलंब होत असल्याने समस्त मातंग समाज आणि तत्सम जातींमध्ये प्रचंड असंतोष निर्माण होत आहे. मांगवीर महामोर्चातून तो सरकारकडे व्यक्त करण्यात येत आहे. तेव्हा आपणांस नम्र विनंती आहे की, मातंग व तत्सम वंचित जातींना या जून महिन्यापासून आरक्षणाचा लाभ मिळून देऊन या वंचित जातींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी येत्या जून महिन्यापासून अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरणाची अंमलबजावणी सुरू करावी.

# यवत ‘खून’ प्रकरणातील मुख्य आरोपींना यवत पोलिसांकडून अटक

## खूनाचे मुख्य ‘कारण’ आले समोर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

रात्रीच्या वेळी यवत ता.दौंड येथील मुळीक वस्तीवर तीन अज्ञात इसमांनी शशिकांत पांडुरंग चव्हाण यांच्या घरावर हल्ला करून त्यांचा मुलगा विश्वजित चव्हाण याचा खून केला केला होता,तर शशिकांत चव्हाण,उज्वला शशिकांत चव्हाण आणि प्राची वैभव यादव यांना जबर मारहाण करून गंभीर जखमी करण्यात आले होते.याबाबत विश्वजित चव्हाण यांची पत्नी सारिका चव्हाण हिने फिर्याद दिली होती.

यवत पोलीस आणि स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने तपासाची चक्रे गतीने फिरवत यातील आरोपी निष्पन्न केले आहेत.



पोलिसांनी आरोपी १) सलमान दिलशाद शेख (वय २८ वर्षे रा. पठाणकोट मोहल्ला,हुश मस्जिद जवळ,बडौत ता.जि.बागपथ राज्य – उत्तर प्रदेश) २) मोमीन अकबरशेख.(वय–४५ रा.पठाणकोट मोहल्ला,हुश मस्जिद,जवळ बडौत ता.जि. बागपथ राज्य–उत्तर प्रदेश) अशी नावे असल्याची सांगितले असून त्यांनी त्यांचे साथीदार ३) रावतसिंग चौधरी जगदेवसिंग तोमर (वय –२६ धंदा– रा. बडौत जि. बागपथ राज्य – उत्तर प्रदेश) ४) गुलशन उर्फ मोठा जहांगीर खान (वय–२५ धंदा–गुराळ कामगार रा. काशीराम कॉलनी बडौद ता. जि. बागपथ राज्य–उत्तर प्रदेश) यांचे मदतीने नमुद गुन्हा केल्याचे सांगितले.तसेच यातील इतर दोन आरोपी रावतसिंग चौधरी व गुलशन उर्फ मोठा जहांगीर खान हे घटनास्थळाचे परिसरात त्यांची पडलेली बॅग शोधायला गेले असल्याचे सांगितल्याने त्यांना शोधण्यासाठी यवत पोस्टे चे पथक व स्थानिक गुन्हे शाखेची पथके खानाकरून त्यांना ताब्यात घेण्यात आले.वरील आरोपिंना यवत पोलिसांनी अटक केली असून चोरीच्या उद्देशाने घरात घुसून हा हल्ला करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. सदर आरोपी हे परप्रांतीय असल्याची माहिती मिळत आहे.तर काही आरोपी हे गुऱ्हाळावर काम करत असल्याचे आता उघड झाले आहे. या घटनेचा तपास करण्यासाठी पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली अप्पर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी बापूराव दडस,गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर,यवतचे पोलीस निरीक्षक नारायण देशमुख,राहुल गावडे, दत्ताजी गावडे,कुलदीप संकपाळ, प्रवीण सपांगे,सुवर्ण गोसावी, अभिजात सावंत,अमित सिद पाटील,किशोर वागज,सलीम शेख, ईश्वर जाधव,हनुमंत पासलकर,बाळासाहेब कारंडे,सचिन घाडगे,असिफ शेख,महेश बनकर, अतुल फरांदे,रामदास बाबर,विजय कांचन,अभिजित एकशीगे,राहुल पवार,राहुल गुंभे,मंगेश थीगले, योगेश नागरगोजे.रणजित कोंडके, अमोल शेडगे,बाळासाहेब खडके, सागर नामदास,तुषार भोईटे,मंगेश भगत,निलेश शिंदे,अजय घुले,बिबीशन सस्तुरे,गुरुनाथ गायकवाड,संदीप देवकर,महेंद्र चांदणे,रामदास जगताप,अक्षय यादव,दत्तात्रय काळे,विकास कापरे, गणेश कुतवळ,विशाल जावळे,प्रमोद गायकवाड,मारुती बाराते,प्रणव नानावरे यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे. या घटनेचा पुढील तपास यवत पोलीस करत आहेत.

# गावचा नेता असावा तर परागभाऊ जाधव यांच्या सारखा–सचिन खडके

## भिगवण गावच्या हिंदू खाटीक समाजासाठी स्वखर्चाने दिला बोअर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**

भिगवण (ता.इंदापूर) गावातील हिंदू खाटिक समाजाचा पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी स्वतःच्या खिशातून खर्च करून बोअर मारून २४ तास पाणी उपलब्ध करण्याचे काम भिगवण गावचे माजी सरपंच पराग जाधव यांनी केले.त्यांच्या या कामाचे कौतुक खाटिक समाजाचे पुणे जिल्हा अध्यक्ष सचिन खडके यांनीगावचा नेता असावा तर असा उल्लेख करीत समाजाच्या वतीने पराग जाधव यांचा सत्कार केला.



गावचा पुढारी म्हटल कि आश्वासन देन आणि नागरिक आणि प्रत्येक समाजाला झुलवत ठेवण ही परिस्थिती सर्व ठिकाणी पहावयाला मिळते.मात्र भिगवण गावात याच्या उलट परिस्थिती दिसून आली.बाजार समितीचे माजी उपसभापती आणि भिगवण गावचे माजी सरपंच आणि विद्यमान ग्रामपंचायत सदस्य पराग रमेशराव जाधव यांनी हिंदू खाटिक समाजाला आवश्यक असणारा जागेचा प्रश्न सोडविण्यासाठी आवश्यक मदत केली.फक्त जागा मिळवून देण्याचा प्रयत्न केला नाहीतर या ठिकाणी स्वतःच्या पैशाने बोअर मारून पाण्याची सोय करून दिली.त्यामुळे हिंदू खाटिक समाज बांधवांनी जाधव यांचे आभार व्यक्त केले.

यावेळी बोअर पूजन आणि सत्कार समारंभासाठी सत्यवान भोसले,दत्ता धवडे,अमितकुमार वाघ,देवानंद शेलार,तानाजी वायसे,गणेश कांबळे,राजेंद्र जमदाडे,बबलू कांबळे,मनोज खडके,बंडू ताडे,प्रशांत कांबळे,हनुमंत खडके,सौरभ जमदाडे,आकाश कांबळे,केतन कांबळे आदित्य थोर्पे,रेश्मा खडके,त्रिवेणी कांबळे,शुभांगी कांबळे,रुपाली ताडे,तनुजा जमदाडे ईत्यादी उपस्थित होते.

यावेळी बोलताना हिंदू खाटिक समाजाचे पुणे जिल्हा अध्यक्ष सचिन खडके यांनी पराग जाधव यांनी समाजासाठी नेहमीच योगदान दिले असल्याचे सांगितले.समाजासाठी जागा मिळवून देण्यासाठी त्यांचा मोठा वाटा असल्याचे सांगितले.तर आज स्वतःच्या खिशातून समाजासाठी पाणी मिळवून दिल्याने समाज त्यांचा ऋणी असल्याचे सांगितले.

# उमरी तालुक्यातील अनाधिकृत इंग्रजी शाळांची चौकशी करा–अशोक झडते



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । महेश पडोळे**

मागील काही काळा पासून उमरी तालुक्यामध्ये इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे वर्ग अनधिकृत रित्या चालू आहेत उमरी तालुका शैक्षणिक दृष्ट्या नावाजलेला तालुका असून या तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात इंग्रजी माध्यमांच्या शाळा आहेत. परंतु या शाळांमध्ये शैक्षणिक पात्रता नसणारे कर्मचारी शाळेमध्ये शिकवणी घेत आहेत या बाबीकडे गटशिक्षणाधिकारी साहेबांनी लक्ष लक्ष घालून त्या शाळा बंद करण्यात याव्यात व पुढील शैक्षणिक वर्षात नियमाप्रमाणे शाळा चालवाव्यात याबाबतचे निवेदन उमरी तालुका पत्रकार संरक्षण समितीचे अध्यक्ष अशोक झडते यांनी गटशिक्षणाधिकारी यांना दिल्या असून निवेदनाची अंमलबजावणी झाली नसल्यास तीव्र आंदोलन करण्याचाही इशारा त्यांनी निवेदनाद्वारे गटशिक्षणाधिकारी यांना दिला आहे.

# वलांडी ते हैदराबाद आणखी एक बस सेवा सुरु सीमावर्ती प्रवाशांना भालकी अंगाराचा दिलासा

## तीन राज्यांना जोडणारी ऐक्याची बससेवा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**निलंगा । इस्माईल महेबूब शेख**

देवणी तालुक्यातील वलाडी महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमावर्ती भागातील प्रवाशांच्या सोयीसाठी भालकी आगारातर्फ वलांडी हैदराबाद मार्गावर आणखी एक वाढीव बससेवा सुरू करण्यात आली आहे. पत्रकार हसन मोमीन यांनी सातत्याने पाठपुरावा केला आणि त्यांच्या प्रयत्नांना अखेर यश आले. वलांडी ते हैदराबाद या दुसऱ्या बस सेवेचा शुभारंभ गुरुवारी ६ मार्च रोजी करण्यात आला.



ही बस दररोज दुपारी १.३० वाजता वलांडीहून निघेल आणि आळवाई, मेहकर, भालकी, बीदर, जहिराबाद मार्गे हैदराबादला रात्री ८ वाजेच्या सुमारास पोहोचेल. परतीच्याप्रवासातही बस पहाटे ५ वाजता हैदराबादहून निघेल आणि दुपारी १.३० वाजता बलांडी येथे पोहोचेल.बससेवा सुरू झाल्याने वलांडी बसस्थानक परिसरात ग्रामस्थांच्या वतीने भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी चालक संभाजी तळीखेडे आणि वाहक नागनाथ पाटील यांचा शाल, श्रीफळ व फेटा बांधून सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र–कर्नाटक सीमावाद अधूनमधून उफाळत असतो, मात्र ही वलाडी–हैदराबाद बससेवा तेलगू, कबड़आणि मराठी भाषिकांना एका देशप्रेमाच्या माळेत गुंफणार आहे. या बससेवेचा फायदा तीन राज्यातील प्रवाशांना मिळणार असून व्यापारी, विद्यार्थी आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळेल. ही बस महाराष्ट्रातून निघून कर्नाटक राज्यातील प्रवाशांना घेत पुढे तेलंगाणा प्रदेशातून प्रवाशांना सेवा देणार आहे.या कार्यक्रमाला बाजार समितीचे अध्यक्ष उमाकांत नागलगावे, बालाजी सोनकवडे, हसन मोमीन, मुस्ताक कादरी, आसलम ताबोळी, रवी स्वामी, गणेश चवाळे, रामलिंग बावगे, महम्मद शिकूर बौडीवाले आदी मान्यवर उपस्थित होते

ही बससेवा सुरू झाल्यामुळे सीमावर्ती भागातील नागरिक आणि प्रवाशांचे मोठे सोयीचे दुवे निर्माण झाले असून त्यातून समाधान व्यक्त केले जात आहे.**सुरू केल्याबद्दल भालकी आगाराचे व्यवस्थापक भद्राप्पा हुडगे आणि बीदर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. ईश्वर खंड्रे यांचे आभार व्यक्त करण्यात आले.**

# बिलोली नगर परिषदेच्या त्या प्रलंबित प्रकरणात लाखो रुपयांचे अपहार–गैरव्यवहार

## कोणती ती प्रलंबित प्रकरणे लेखापरीक्षणात मात्र अस्पष्ट (गुलदस्त्यात)?

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । नबाजी कुडकेकर**

नगरपरिषद बिलोलीच्या सन २०२० ते २०२२ या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात नगर परिषदेकडे मार्च २०२२ अखेर प्रलंबित असलेले ती चार प्रकरणे व त्यातील गुंतलेली अपहरित रक्कम रुपये १३ लाख ५३ हजार ६१६ आढळून आली आहे. नगरपरिषदेने नगरपरिषद निधीचा गैरव्यवहार अथवा अपहार झाल्याचे निदर्शनास आल्यावर चौकशी पूर्ण झाल्यावर महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता २०११ चे नियम ४७४ नुसार त्याबाबतचा सविस्तर अहवाल माननीय संचालक स्थानिक निधी लेखापरीक्षा, मा. जिल्हाधिकारी नांदेड आणि मा. संचालक यांना गैरव्यवहार/अपहरणाच्या रकमेची किंमत, गैरव्यवहार/अपहरणाची पद्धत, संबंधीताकडून रक्कम वसूल करण्याबाबत केलेली कार्यवाही तसेच संबंधिताविरुद्ध प्रस्तावित केलेली कार्यवाही व यापुढे भविष्यात असा प्रकार होऊ नये याबाबत केलेले नियोजन याचा तपशीलवार अहवाल सादर करणे आवश्यक होते परंतु बिलोली नगरपरिषदेने कुठलेही नियोजन केले नसल्याचे लेखापरीक्षण अहवालात दिसून आले आहे.



नेमकी ती ४ प्रलंबित प्रकरणे कोणती आहेत हे मात्र लेखापरीक्षणात अस्पष्ट असल्याचे सांगितले आहेत. ते चार प्रकरणे कोणती आणि ते लाखो रुपयांचा गैरव्यवहार कोणी केला, कुणाच्या घशात गेले हे मात्र अस्पष्ट असल्याने बिलोली शहरांमध्ये एकच चर्चा चालू आहे. लेखापरीक्षणाच्या अभ्यासानुसार दिल्ली नगरपरिषदेमध्ये लाखो रुपयांचा अपहार गैरव्यवहार झाल्याचे तसेच विविध कामात अनियमितताही आढळून आले आहे. बिलोली शहरवासियांचा दुर्दैव म्हणावं की आजपर्यंत कायमस्वरूपी कुठलेही मुख्याधिकारी भेटले नसल्यामुळे नेहमीच अशा अपहार आणि गैरव्यवहाराला सामोरे जावे लागत आहे. बिलोली नगरपरिषद वर कुणाचेही अंकुश नसल्यामुळे हे सर्व घडत असल्याचेही बिलोली शहरात चर्चा होत आहे. या लाखो रुपयांच्या अपहार आणि गैरव्यवहारात नेमके कोणाचे हात आहे हे अजूनही अस्पष्ट असले तरी भविष्यात त्याबद्दल नक्कीच कळेल, परंतु नगर परिषदेने त्यांच्याकडील मार्च २०२२ अखेर प्रलंबित असलेली ती चार प्रकरणे व त्यातील गुंतलेली अपहारित रक्कम १३ लाख ५३ हजार ६१६ रुपये वसूल करण्याकरिता कोणतेही कार्यवाही केलेली नाही असे लेखापरीक्षणात नमूद करण्यात आले आहे तरी नगर परिषदेने उक्त नियमाप्रमाणे कार्यवाही करून संबंधितांकडून अपहारित रक्कम लवकरात लवकर वसूल करावे, अशी बिलोली शहरातील नागरिकांच्या वतीने करण्यात येत आहे. या प्रकरणाकडे जिल्हाधिकारी साहेब नांदेड यांनी गांभीर्याने बघून ती चार प्रकरणे कोणती आहेत? त्याचा उलगडा करावा व याचे सविस्तर चौकशी करण्यात यावी असे मागणी शहर वासियांच्या वतीने करण्यात येत आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904